॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. उन्हाळी परीक्षा/समन्वय/२०२५-२६/८८६३ दिनांक :२४/०४/२०२६

**उन्हाळी-२०२६ च्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबतचे**

**('तक्ता-ब' मध्ये समाविष्ट असलेल्या महाविद्यालयांकरीता)**

**<u>महत्वाचे परिपत्रक</u>**

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये
('तक्ता-ब' मध्ये समाविष्ट असलेले )
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी विज्ञान अभ्यासक्रमाच्या ('तक्ता-ब' मधील महाविद्यालये) प्रात्यक्षिक परीक्षेबाबत

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२६ च्या पदवी विज्ञान अभ्यासक्रमाच्या ('तक्ता-ब' मधील महाविद्यालये) प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २५/०४/२०२६ ते दिनांक ०५/०५/२०२६ या कालावधीमध्ये आयोजीत करण्याबाबत विद्यापीठाव्दारे कळविण्यात आलेले आहे.

उन्हाळी-२०२६ च्या विज्ञान प्रात्यक्षिक परीक्षेसाठी ज्या महाविद्यालयाने विद्यापीठाने ठरवून दिलेल्या कालावधीत भौतिक सोईसुविधा, रसायणे व प्रायोगिक साहित्य खरेदी करून विद्यार्थ्याचे प्रात्यक्षिक वर्ग घेतले आहेत अशा सोबत जोडलेल्या यादीनुसार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा या त्याच महाविद्यालयामध्ये विद्यापीठाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार व नियुक्त केलेल्या परिक्षकाच्या उपस्थित घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.

या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, विज्ञान प्रात्यक्षिक परीक्षेचे संख्येनुसार व स्वरूप लक्षात घेवून महाविद्यालय स्तरावर विद्यापीठाव्दारे नियुक्त केलेल्या परिक्षकांशी चर्चा करून नियमानुसार पदवी विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन करावे व त्यासंबंधीचा कार्यअहवाल (उदा. वेळापत्रक, ठरवून घेतलेल्या विषय निहाय व संख्यानिहाय बॅच इत्यादी ) प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ यांच्याकडे सादर करावे जेणे करून येणा-या समस्या सोडविण्यास मदत होईल.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ